प्रेतयात्रा म्हणजे निसर्गाची जप्ती! कशी जप्ती? तेव्हा म्हणे, नावावर जो बँक बँलन्स होता तो जप्त झाला, मुलं जप्त झाली, बंगला जप्त झाला, हे कपडे जे नावावर होते तेही जप्त झाले. सर्वकाही जप्तीत गेले. तेव्हा म्हणतो, 'साहेब, आता मला तिथे काय सोबत घेऊन जायचे?' तर म्हणे, 'लोकांबरोबर जेवढे गुंते निर्माण केले होते, तेवढेच सोबत घेऊन जा.' अर्थात् या नावावर जे आहे ते सगळे जप्तीमध्ये जाणार आहे, म्हणून आपल्याला स्वत:साठी काही करायला पाहिजे ना? नको का करायला?

## पाठवा, पुढच्या जन्माची गाठोडी

जे आमचे नातेवाईक नाहीत, अशा परक्या लोकांना काही सुख दिले असेल, त्यांच्या कामासाठी फेऱ्या मारल्या असतील, त्यांना दुसरी काहीही मदत केली असेल, तर ती 'तिथे' पोहोचते. नातेवाईकांसाठी नाही, परंतु परक्यांसाठी. मग येथे लोकांना औषधासाठी पैसे दिले असतील, औषधदान मग दुसरे आहारदान दिले असेल, नंतर ज्ञानदान दिले असेल आणि अभयदान, हे सगळे दिले असेल तर ते सर्व तिथे सोबत येईल. यातील काही देता की मग असेच आहे सर्व? खाऊन टाकता?

जर सोबत घेऊन जाता आले असते तर हा तर असा आहे की तीन लाखांचे कर्ज करुन जाणार. धन्य आहे ना? हे जग असेच आहे, म्हणून सोबत घेऊन जाता येत नाही हेच चांगले आहे.

## मायेची करामत

जन्म माया निर्माण करते, लग्न माया निर्माण करते आणि मृत्यू हे सुद्धा मायाच निर्माण करते. पसंत असो वा नसो, पण सुटकाच नाही. परंतु अट एवढीच असते की मायेचे साम्राज्य नाही. मालक तुम्ही आहात. अर्थात तुमच्या इच्छेनुसार होत आहे. मागील जन्मी आपली जी इच्छा होती, त्याचा हिशोब निघाला आणि त्यानुसार माया चालवत आहे. तेव्हा मग आता आरडाओरड करुन चालणार नाही. तुम्हीच मायेला सांगितले होते की हा माझा ताळेबंधी हिशोब (लेखा-जोखा) आहे.

## आयुष्य एक तुरुंग

**प्रश्नकर्ता :** आपल्या हिशोबाने आयुष्य काय आहे?

**दादाश्री :** माझ्या हिशोबाने आयुष्य, हा एक तुरुंग आहे तुरुंग! ती चार प्रकारची तुरुंगे आहेत.

एक नजरकैद आहे. देवलोक नजरकैदेत आहेत. हे मनुष्य साध्या कैदेत आहेत. जनावरे कडक मजूरीवाल्या कैदेत आहेत आणि नरकातील जीव जन्मठेपेच्या कैदेत आहेत.

## जन्मापासून चालूच आहे करवत

हे शरीर शुद्धा प्रत्येक क्षणी मरत आहे, पण लोकांना काय त्याची जाणीव आहे? आपले लोक तर, लाकडाचे दोन तुकडे झाले आणि खाली पडले, तेव्हा म्हणतील, 'कापले गेले' अरे, हे तर कापलेच जात होते. करवत चालूच होती.

## मृत्यूचे भय

हे निरंतर भय वाटेल असे जग आहे. एका क्षणासाठी देखील निर्भयता या जगात नाही, आणि जितकी निर्भयता वाटते, तितका त्याच्या मूर्छीत अवस्थेत आहे तो जीव. उघड्या डोळ्यांनी झोपलेले आहेत, म्हणून हे सगळे चालले आहे.

**प्रश्नकर्ता :** असे म्हटले जाते की आत्मा मरत नाही, तो तर जिवंतच असतो.

**दादाश्री :** आत्मा मरतच नाही, परंतु जोपर्यंत तुम्ही आत्मस्वरूप झाले नाहीत, तोपर्यंत तुम्हाला भीती वाटत राहते ना? मरणाची भीती वाटते ना? आता जर शरीरात काही आजारपण आले तर 'जावे लागेल, मरावे लागेल' अशी भीती वाटते. देहदृष्टी नसेल, तर स्वतः मरत नाही. परंतु हे तर 'मीच आहे, हाच मी आहे,' असे तुम्हाला शंभर टक्के पक्के वाटते. तुम्हाला हा चंदूलाल तो मीच आहे, अशी शंभर टक्के खात्री आहे ना?

## यमराज की नियमराज?

या हिंदुस्तानातील सर्व गैरसमजा मला काढून टाकायच्या आहेत. संपूर्ण देश बिचारा या संभ्रमातच बेहाल झाला आहे. म्हणूनच यमराज नावाचा कोणीच जंतू नाही, असे मी पूर्ण गॅरंटीने सांगत आहे. तेव्हा कोणी विचारेल, 'पण काय असेल? काहीतरी असेलच ना?' तेव्हा मी सांगितले, 'नियमराज आहे!' हे मी पाहून सांगतो. मी काही वाचलेले बोलत नाही. हे मी माझ्या दर्शनाने पाहून, या डोळ्यांनी नाही, माझे जे दर्शन आहे, त्याने पाहून मी हे सर्व सांगत आहे.

## मृत्यूनंतर काय?

**प्रश्नकर्ता :** मृत्यूनंतर कोणती गती होणार?

**दादाश्री :** संपूर्ण आयुष्यात जी कार्ये केली असतील. आयुष्यभर जे धंदे चालवले असतील, केले असतील, त्याचा ताळेबंदी हिशोब मरणाच्या वेळी निघतो. मरण्याच्या एक तास आधी ताळेबंदी हिशोब समोर येतो. येथे जे जे बिनहक्काचे हिसकावले असेल, पैसे हिसकावले असतील, बायका पळविल्या असतील, सर्वकाही बिनहक्काचे हिसकावतात बुद्धीने, वाटेल त्याप्रकारे बळकावतात. त्या सगळ्यांना जनावर गती प्राप्त होते आणि जर आयुष्यभर सज्जनता ठेवली असेल तर मनुष्यगती प्राप्त होते. मरणोपरांत चार प्रकारच्या गती असतात. जो साऱ्या गावाचे पीक जाळून टाकतो, आपल्या स्वतःच्या स्वार्थासाठी, असे असतात ना इथे? त्यांना शेवटी नरकगती मिळते. अपकारा समोर देखील उपकार करतात, असे लोक सुपर ह्युमन असतात. ते मग देवगतीत जातात.

## योग उपयोग परोपकाराय

मन-वचन-काया आणि आत्म्याचा उपयोग लोकांसाठी कर. तुझ्या स्वतःसाठी करशील तर रायणी(झाडाचे नाव) चा जन्म मिळेल. मग पाचशे वर्ष भोगतच रहा. मग तुझी फळे लोकं खातील. लाकडे जाळतील.

तोंडाला पाणी लावून, येऊन बसतो आरामात. हा अभिनय आहे. दी वर्ल्ड इज दी ड्रामा इटसेल्फ,(जग स्वयं एक नाटक आहे.) तुम्हाला नाटकच करायचे आहे, केवळ अभिनयच करायचा आहे, परंतु अभिनय 'सिन्सिअरली' करायचा.

## जीव भटकतो तेरा दिवस?

**प्रश्नकर्ता :** मृत्यूनंतर तेरा दिवसांचा रेस्ट हाऊस असतो, असे म्हटले जाते.

**दादाश्री :** तेरा दिवसांचे तर या ब्राम्हणांचे असते, मरणाऱ्याला त्याचे काय? हे ब्राम्हण असे म्हणतात की, रेस्ट हाउस आहे. घरावर बसून बघत राहील, अरे मुर्खा कशासाठी बघत राहिल? कसा हा गोंधळ! अंगठ्याइतकाच आहे, आणि कौलावर बसून राहतो. असे म्हणतात! आणि आपले लोक हे खरे मानतात. आणि हे जर खरे मानले नसते तर तेरावं केले नसते या लोकांनी. तेरावं करण्याच्या फंद्यातच पडले नसते.

**प्रश्नकर्ता :** गरुड पुराणात लिहिले आहे की अंगठ्याइतकाच आत्मा आहे.

**दादाश्री :** हो, त्याचे नावच गरुड पुराण आहे ना, पुराणे (जुने) म्हटले जाते. म्हणे अंगठ्या इतका आत्मा, म्हणून प्राप्तीच होत नाही ना, दिवसच फिरत नाही, प्रगति होत नाही! करायला गेले साईन्टिफिक, हेतू साईन्टिफिक होता परंतु थिंकिंग (विचारसरणी) सगळे बिगडून गेले. हे लोक त्याच्या नावावर क्रिया करतात आणि क्रिया करण्याआधी ब्राम्हणांना दान देतात. तेव्हा दान देण्यायोग्य ब्राम्हण होते, त्या ब्राम्हणांना दान दिल्यावर पुण्य घडत होते. आता तर सगळे जर्जरित झाले आहे. ब्राम्हण इथून पलंग घेऊन जातो, त्या पलंगाचा सौदा आधीच झालेला असतो. की हा पलंग दोनशे रुपयात तुला देईल, गोदडीचा सौदा केलेला असतो, चादरीचा सौदा केलेला असतो. आपण दुसरे सगळे देतो, कपडे, साधन वगैरे सर्व, ते सुद्धा विकून टाकतात. मग हे तिथे आत्म्यापर्यंत पोहोचेल, असे कसे मानून घेतले लोकांनी?

**प्रश्नकर्ता :** दादाजी, आता तर किती लोक ब्राम्हणांना सांगतात की, तुम्हीच सगळे आणा, आम्ही ठराविक पैसे देऊ.

**दादाश्री :** हे तर आज नाही, कितीतरी वर्षांपासून करत आहेत, ठराविक पैसे देऊ, तू घेऊन ये. आणि तो दुसऱ्याने दिलेली खाट घेऊन येतो! आता बोला! तरीही लोकांना हे चुकीचे आहे असे मानता येत नाही, आणि गाडी तर जशीच्या तशी चालतच राहते. जैन असे करत नाहीत. जैन फार पक्के असतात. म्हणून ते असे-तसे करत नाही. असे-तसे काही नाहीच. इथून आत्मा निघाला की सरळ त्याच्या गतीमध्ये जातो, योनी प्राप्त होऊनच जाते.

## मारणाऱ्याला नाही काही घेणे-देणे

**प्रश्नकर्ता :** मरणाऱ्याच्या मागे भजन-कीर्तन करायचे की नाही? त्याच्याने काय फायदा होतो?

**दादाश्री :** मरणाऱ्या व्यक्तिला त्याच्याशी काहीच घेणे-देणे नाही.

**प्रश्नकर्ता :** मग या ज्या आमच्या धार्मिक विधी आहेत, मृत्यूनंतर ज्या काही विधी केल्या जातात, त्या बरोबर आहेत की नाही?

**दादाश्री :** यामधील एक अक्षर देखील खरे नाही. गेले ते गेले. लोकं तर आपल्या आपणच करतात आणि समजा असे सांगितले की आपल्यासाठी करा ना, तर म्हणतात, 'नाही भाऊ, वेळच नाही मला.'... जर वडिलांसाठी करायला सांगितले, तर तेव्हाही करणार नाहीत अशी आहेत ही लोकं. परंतु शेजारी म्हणतात की, 'अरे मेल्या, तुझ्या वडिलांचे कर, तुझ्या वडिलांचे कर.' ते शेजारचे जबरदस्तीने करायला लावतात.

**प्रश्नकर्ता :** मग हे गरुड पुराण बसवतात. ते काय आहे?

**दादाश्री :** गरुड पुराण तर, जे रडत राहतात ना, ते गरुड पुराणमध्ये जातात, म्हणजे फक्त शांती मिळविण्यासाठी हे सगळे मार्ग आहेत.

**प्रश्नकर्ता :** अंतिम वेळेस कोणाला माहित की कान बंद होऊन जातील?

**दादाश्री :** अंतिम वेळेस तर आज जे आपल्या वहिखात्यात जमा आहे ना, ते समोर येते. मृत्यू वेळीचा तास, जे गुणस्थान येते ना, ते सार आहे आणि तो ताळेबंदी हिशोब फक्त संपूर्ण जीवनाचा नाही, परंतु आधी जो जन्म घेतला आणि नंतरचा, या मधल्या भागाचा हिशोब आहे. मृत्यूवेळी लोक कानामध्ये बोलतात की, 'बोला राम, बोला राम' अरे मुर्खा राम का बोलावतो आहेस? राम तर गेले कधीचे!

पण लोकांनी असे शिकवले की असे काहीतरी करावे. परंतु ते तर आत पुण्य जागे असेल तरच ॲडजेस्ट होते. आणि तो मरणारा तर मुलीच्या लग्नाच्या चिंतेतच पडलेला असतो. या तीन मुलींचे लग्न झाले आणि ही चौथी राहून गेली. या तिघी विवाहित झाल्या पण ही धाकटी तेवढी राहिली. रक्कम मांडली की मग ती पुढे येऊन उभी राहते. आणि ते लहानपणी चांगले केलेले येणार नाही, पण म्हातारपणी चांगले केलेले येईल.

## निसर्गाचा किती सुंदर कायदा

म्हणजे येथून जातो, तो सुद्धा निसर्गाचा न्याय, ठीक आहे ना! परंतु वीतराग सावधान करतात की भाऊ, पन्नास वर्षे झाली आता सावध हो!

पंच्याहत्तर वर्षाचे आयुष्य असेल तर पन्नास वर्षात पहिला फोटो निघतो आणि साठ वर्षाचे आयुष्य असेल, तेव्हा चाळीसाव्या वर्षी फोटो निघतो. एक्यांशी वर्षाचे आयुष्य असेल तर चौपनाव्या वर्षी फोटो निघून जातो. परंतु तोपर्यंत इतका टाइम फ्री ऑफ कॉस्ट(मोफत) मिळतो, दोन तृतीयांश हिस्सा फ्री मध्ये मिळतो आणि एक तृतीयांश भागात त्याचा मग फोटो निघत राहतो. कायदा चांगला आहे की जोर-जबरदस्तीवाला आहे? जोर-जबरदस्तीवाला नाही ना? न्यायसंगत आहे ना? दोन तृतीयांश भागात

कितीतरी महात्म्यांचे मृत्यू झाले, त्या सगळ्यांना 'मी शुद्धात्मा आहे,' 'मी शुद्धात्मा आहे' असे भान राहत होते.

## गतीची निशाणी

**प्रश्नकर्ता :** मृत्यूच्या वेळी अशी कोणती निशाणी आहे की ज्यामुळे समजेल की या जीवाची गती चांगली झाली की नाही?

**दादाश्री :** त्यावेळी 'माझ्या मुलीचे लग्न झाले की नाही? असे झाले नाही,' अशा कारणांनी सगळे घर जर डोक्यावर घेत असेल, उपाधी करत असेल, तर समजायचे की त्याची अधोगती झाली. आणि जर आत्म्यात राहत असेल अर्थात भगवंतांच्या नामात राहत असेल तर चांगली गती झाली.

**प्रश्नकर्ता :** परंतु काही दिवस बेशुद्धीत असेल तर?

**दादाश्री :** बेशुद्धीत असेल, तरीही आतून ज्ञानात असेल तर चालेल. हे ज्ञान घेतलेले असायला हवे. मग तो बेशुद्ध असला तरीही चालेल.

## मृत्यूची भीती

**प्रश्नकर्ता :** तर सगळ्यांना मृत्यूची भीती का वाटत असते?

**दादाश्री :** मृत्यूची भीती तर अहंकाराला असते. आत्म्याला काहीच नसते. भीती अहंकाराला असते की, मी मरुन जाईल. मी मरुन जाईल.

## या दृष्टीने बघा तरी....

असे आहे ना, भगवंताच्या दृष्टीने या जगात काय चालले आहे? तेव्हा म्हणतात, 'त्यांच्या दृष्टीने कोणी मरतच नाही,' भगवंताची जी दृष्टी आहे ती दृष्टी जर आपल्याला प्राप्त झाली, एका दिवसासाठी त्यांनी ती दृष्टि आपल्याला दिली, तर इथे कितीही लोक मेले तरीही आपल्यावर त्याचा परिणाम होणार नाही. कारण भगवंताच्या दृष्टीने कोणी मरतच नाही.

## जीव तर मरण, शिव तर अमर

कधी ना कधी तर सोल्यूशन काढावे लागेल ना? जीवन-मृत्यूचे सोल्यूशन नाही का काढावे लागणार? खरोखर स्वतः मरतही नाही आणि जगतही नाही. ही मान्यताच चुकीची आहे की स्वतःला जीव मानून बसला आहे. स्वतःचे स्वरुप शिव आहे. स्वतः शिव आहे परंतु हे स्वतःला समजत नाही आणि स्वतःला जीव स्वरूप मानून बसला आहे!

**प्रश्नकर्ता :** असे प्रत्येक जीवाला समजायला लागले तर जग चालणार नाही ना?

**दादाश्री :** हो, नाहीच चालणार ना, परंतु हे प्रत्येक व्यक्तिला समजेलच असे नाही ना! हे तर पझल (कोडे) आहे सगळे, अत्यंत गुह्य, अतिशय गुह्यतम. गुह्यतमच्या कारणामुळे तर हे सर्व असे पोलम्पोल जग चालत राहते.

## जगतो-मरतो, तो कोण?

हा जन्म-मृत्यू आत्म्याला नाही. आत्मा परमनेन्ट वस्तू आहे. जन्म-मृत्यू इगोइजमला (अहंकाराला) आहे. इगोइजम जन्म घेतो आणि इगोइजम मरतो. वास्तवात आत्मा स्वतः मरतच नाही. अहंकारच जन्म घेतो आणि अहंकारच मरतो.

❖ ❖ ❖ ❖ ❖

वियोगी स्वभावाचेच असतात. आपण शाळेत शिकायला गेलो तेव्हा सुरुवात केली होती की नाही, बिगिनिंग? मग एन्ड (अंत) आला की नाही? प्रत्येक गोष्ट बिगिनिंग आणि एन्डवालीच असते. इथे या सगळ्या गोष्टींचा बिगिनिंग आणि एन्ड होतोच. नाही समजले का तुला?

**प्रश्नकर्ता :** हो, समजले ना!

**दादाश्री :** या सगळ्या गोष्टी बिगिनिंग-एन्डवाल्या आहेत, परंतु बिगिनिंग-एन्ड यास जाणणारा कोण आहे?

सगळ्या वस्तू बिगिनिंग-एन्डवाल्या आहेत त्या टेम्परररी (अस्थायी-तात्पुरत्या) वस्तू आहेत. ज्याचे बिगिनिंग होते, त्याचा एन्ड होतो, सुरुवात आहे त्याचा अंत अवश्य आहेच. या सगळ्या वस्तू टेम्परररी आहेत, परंतु टेम्परररीला जाणणारा कोण आहे? तू परमनन्ट आहे, कारण की तू या वस्तूंना टेम्परररी म्हणतोस, म्हणून तू परमनन्ट आहे, जर सगळ्या गोष्टी टेम्परररी असतील तर मग टेम्परररी म्हणण्याची गरजच नव्हती. टेम्परररी सापेक्ष शब्द आहे. परमनन्ट आहे तर टेम्परररी आहे.

## मृत्यूचे कारण

**प्रश्नकर्ता :** तर मृत्यू का येतो?

**दादाश्री :** ते तर असे आहे, जेव्हा जन्म होतो, तेव्हा हे मन-वचन-कायेच्या तीन 'बॅटऱ्या' आहेत, ज्या गर्भामधून इफेक्ट (परिणाम) देत जातात. तो इफेक्ट पूर्ण होतो, 'बॅटरींचा' हिशोब पूर्ण होईपर्यंत त्या बॅटऱ्या राहतात आणि नंतर संपून जातात, त्याला मृत्यू म्हणतात. पण तेव्हा परत पुढच्या जन्मासाठी आतमध्ये नवीन बॅटऱ्या चार्ज झालेल्या असतात. पुढच्या जन्मासाठी आतमध्ये नवीन बॅटऱ्या चार्ज होत असतात आणि जुन्या 'बॅटऱ्या' 'डिस्चार्ज' होत राहतात. असे 'चार्ज-डिस्चार्ज' होतच राहते. कारण त्याला 'रोंग बिलीफ' (चुकीची मान्यता) आहे. म्हणून 'कॉजेस' उत्पन्न होत राहतात, जोपर्यंत 'रोंग बिलीफ' आहे, तोपर्यंत राग-द्वेष आणि

## मृतकांचे प्रतिक्रमण

**प्रश्नकर्ता :** ज्याची क्षमा मागायची आहे त्या व्यक्तिचा देहविलय झाला असेल, तर प्रतिक्रमण कसे करायचे?

**दादाश्री :** देहविलय झाला असेल, तरी पण जर त्याचा फोटो असेल, त्याचा चेहरा आठवत असेल, तर प्रतिक्रमण करू शकता. चेहरा जरी आठवत नसेल आणि नाव माहित असेल, तर नाव घेऊनही करू शकता, तरीही त्याला पोहोचेल सर्व.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे मृतक व्यक्तिचे प्रतिक्रमण कशाप्रकारे करायचे?

**दादाश्री :** मन-वचन-काया, भावकर्म, द्रव्यकर्म, नोकर्म मृतकाचे नाव तसेच त्याच्या नावाची सर्व मायेपासून भिन्न अशा त्याच्या शुद्धात्म्याला आठवायचे. आणि नंतर 'अशी चूक झाली होती' ते आठवून (आलोचना) त्या चुकांसाठी मला पश्चाताप होत आहे आणि त्यासाठी मला क्षमा करा (प्रतिक्रमण). अशा चुका पुन्हा होणार नाहीत असा दृढ निश्चय करतो, असे नक्की करा. (प्रत्याख्यान). 'तुम्ही' स्वतः चंदूभाऊचे ज्ञाता-दृष्टा रहायचे आणि जाणायचे की चंदूभाऊने किती प्रतिक्रमण केले, किती सुंदर केले आणि किती वेळा केले.

❖ ❖ ❖ ❖ ❖

